| MHLA050000602019 | नि.दि.दावा क्र ०७/२०१९<br>अनुसया वि शासन |
|---|---|

<u>नि क्र १५२ वरील आदेश</u>

सदरचा अर्ज प्रतिवादी क्र ४ तर्फे देण्यात आल्याचे नमुद केले असून तो दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ क्रम ७ नियम ११ अन्वये दिला आहे.

२. प्रतिवादीच्या कथनानुसार दाव्यास कारण घडलेले नाही. वादीने पत्रव्यवहार, अर्ज किंवा प्रतिनिधीत्व यांना दाव्यास कारण म्हणून दाखविले आहे मात्र कौटूंबीक निवृत्तीवेतन हा प्रशासकिय निधी असून त्याचा निर्णय संबंधीत विभागीय प्राधिकारण घेते.

३. वादपत्रातील घटनांमध्ये परस्पर विरोधी कथन आहे. वादी स्वताला मयत मोहनराव यांची पहिली पत्नी असल्याचे नमुद करते व दुसरीकडे वारसत्वाचा प्रश्न प्रकरणात प्रलंबीत असल्याचे मान्य करते, त्यामुळे दाव्यातील कारणात विरोधाभास आहे.

४. वादीचा हक्क तात्काळ बाधीत झाला असे दाव्यास कारणातून दिसत नाही.

५. प्रतिवादी क्रमांक ४ चा विवाह अवैध असल्याचे वादी कथन करते मात्र त्याचवेळी प्रतिवादी ४ ला निवृत्तीवेतन मंजूर झाल्याचे मान्य करते. त्यामुळे तिच्या कथनांमध्ये विसंगती आहे. अधिका-यांच्या चौकशीत वादी पहिली पत्नी असल्याचे निष्पन्न झाले मात्र निवृत्तीवेतन प्रतिवादी क्र ५ ला मंजूर केले. दिनांक ११/०६/२०१८ रोजी वादीस तिच्याऐवजी दुस-या व्यक्तीचे नांव नोंदल्याचे दिसले, असे नमुद असूनही दाव्यास कारण सप्टेंबर २०१८ मध्ये घडले असे विरोधाभासी कथन आहे.

६. वादकथनामध्ये प्रतिवादी ५ ने तथ्य लपवून निवृत्तीवेतनासाठी अर्ज केला आणि प्रतिवादी ४ ने चौकशी करुन अहवाल दयायचा आदेश केला असे कथन आहे, जे विसंगत आहे.

७. किरकोळ अर्ज १९२/२०१८ हा वारस दाखल्यासाठी प्रलंबीत आहे तरी वादीने हक्क ज्ञापनाचा दावा दाखल केला. त्या वारस अर्जाचा निकाल होणे आवश्यक आहे. वादी पहिली पत्नी असेल तर तिचे नांव मयत मोहनराव याच्या नोकरीचे ठिकाणी अभिलेखात असणे अपेक्षीत होते व प्रशासकिय प्रक्रिया सुरु असताना वादीने दावा दाखल केला. दाव्यास कारण खरबवाडीमध्ये घडले असे वादी म्हणते मात्र प्रतिवादींची

कार्यालये वेगवेगळया ठिकाणी आहेत.

८. वादीने निव्वळ स्वताचे अस्तीत्व पहिली पत्नी म्हणून असल्याचे जाहिर करुन मागितले मात्र निवृत्तीवेतन आदेश रदद करुन मागितला नाही. प्रतिवादी क्र ५ चा दर्जा बेकायदेशीर विवाहाने आलेला आहे असे वादी म्हणते मात्र निवृत्तीवेतन आदेश कायम आहे. वादीला कथीत हक्कभंगाची माहिती पूर्वीपासून होती तरीही तिने कोणतीही कार्यवाही केली नाही. त्यामुळे वादीने तिचा दावा दाखल करायचा अधिकार उशीरा वापरला. वादीने अपूरे हक्कज्ञापन मागितले आहे. कुटूंबनिवृतीवेतनासाठी नामनिर्देशनाद्वारे प्रतिवादी ४ यांना मोहनराव यांनी नामनिर्देशन करतेवेळी महाराष्ट्र शासनाकडून मंजूर करण्यात आलेले निवृत्तीवेतन स्वीकारण्यास प्रतिवादी ४ जनाबाईचे नांव त्यांचया मृत्युपर्यंत कधीही रदद न करता नविन दर्शविलेले नाही.

९. पेन्शन देणे हा प्रशासकिय निर्णय आहे व तो शासनाने बनविलेल्या नियमानुसार दिला जातो. त्याबददल दिवाणी न्यायालयास हस्तक्षेप मर्यादीत स्वरुपात करता येतो. निवृत्तीवेतन मंजूरी / नामंजूरी हे अधिकार न्यायालयाचे नाही. दिवाणी न्यायालयात दावा दाखल करुन वादीने न्यायालयाला प्रशासकिय आदेशात हस्तक्षेप करण्यास विनंती केली आहे. दावा मूदतपूर्व आहे. प्रशासकिय आदेश रदद करुन मागितलेला नाही. निवृत्तीवेतन मंजूर करणारी प्राधिकरणे दाव्यात सामील नाहीत. ज्या प्राधिकरणावर आदेशाचा परिणाम होणार आहे, ते प्राधिकरण पक्षकार नाही. पेन्शन मंजूरी हा विषय शासनाच्या सेवा नियमांशी व प्रशासकिय अधिकारांशी संबंधीत आहे. शासन व संबंधीत प्राधिकरण यांना सामिल पक्षकार करणे आवश्यक आहे. वादीने बराचकाळ कोणतीही हरकत घेतली नाही, तिच्या वर्तनामुळे व विलंबामुळे ती प्रतिवादी ४ च्या स्थीतीला आव्हान देण्यास रोखली जाते त्यामुळे वादीचे वादपत्र फेटाळण्यात यावे अशी विनंती करण्यात आली. सोबत जनाबाई जगताप यांचे शपथपत्र देण्यात आले.

१०. वादीने दिलेल्या म्हणण्यानुसार प्रस्तुतचा अर्ज चालण्यास पात्र व बेकायदेशीर आहे. दाव्यास कारण घडले नसेल तर असा अर्ज देता येतो. दावा परिच्छेद १४ मध्ये याबददल विशेषत्वाने नमुद आहे. त्यामुळे कॉस्ट सह अर्ज फेटाळावा व निशाणी १४६ वरील आदेशाची पुर्तता प्रतिवादीने करावी असे त्यांना निर्देशीत करावे अशी विनंती वादीतर्फे करण्यात आली.

११. याकामी प्रतिवादी क्र ४ हे महालेखाकार निवृत्तीवेतन विभाग, नागपूर हे आहेत. प्रस्तूतचा अर्ज प्रतिवादी क्र ४ यांनी दिल्याचे अर्जाच्या ओळ क्र १ मध्ये नमुद आहे

मात्र अर्जातील कथने प्रतिवादी क्र ५ यांनी केल्याचे दिसते त्यामुळे हा अर्ज प्रतिवादी ५ साठी दिला आहे असे समजता येते.

१२. प्रतिवादी ५ तर्फे विधीज्ञ श्रीमती बेंबळकर यांनी केलेल्या युक्तीवादामध्ये दाव्यास कारण घडलेले नाही. वेगवेगळया तारखा नमुद करुन जबरदस्तीने कारण घडल्याचे दाखविण्यात आले. वादीने निरंतर ताकिदीची मागणी केलेली नाही. दाव्यास प्रतिष्ठंभ या तत्त्वाचा बाध येतो. प्रतिवादी ५ ही कायदेशीर पत्नी आहे त्यामुळे तिला पेन्शन मंजूर झाली. दावा चालण्यास पात्र नाही. वादीला प्राधिकरणापुढे दाद मागता येते. त्यामुळे वादपत्र फेटाळावे अशी विनंती करण्यात आली. तसेच सोबत त्यांनी लेखी युक्तीवाद सादर केला.

१३. वादीतर्फे विधीज्ञ श्री साबने यानी, योग्य कारण नमुद करुन दावा दाखल केला आहे, वादीचा पुरावा संपला आहे, प्रतिवादी ५ चा पुरावा सुरु आहे, प्रतिवादी ५ साक्ष देण्यास टाळाटाळ करते, त्यामुळे अर्ज नामंजूर करावा अशी विनंती करण्यात आली.

१४. प्रतिवादी ५ तर्फे देण्यात आलेले न्यायनिर्णय व त्यावर त्यांनी केलेला युक्तीवाद

प्रतिवादीने झारखंड सरकार वि जितेंद्रकुमार *(*२०१३*)* १२ एस सी सी २१०*,* मध्ये चा उल्लेख करुन नमुद केले की, पेन्शन ही ज्या व्यक्तीस मिळायची आहे त्या निर्देशीत केलेल्या व्यकतीलाच मिळायला हवी व तो त्याचा घटनात्मक अधिकार आहे. पेन्शन ही मिळकत असून ती ठरवून देणा-या अधिकारीतेकडे त्याबददल दाद मागावी लागते.

१५. प्रतिवादीने चर्च ऑफ क्राईस्ट चारीटेबल ट्रस्ट वि पोन्नीमल इज्यूकेशन सोसयटी *(*२०१२*)* ८ एस सी सी पान नं ७०६ मध्ये नमुद केल्याप्रमाणे दाव्यास कारणचा घडले नसेल तर सदरचे वादपत्र फेटाळावे. तसेच वादीला अध्यापी त्यांनी पेन्शन विभागाकडे तक्रारी उभारल्या असून त्याचा निपटारा झाला नसताना सदर दावा केला आहे, त्यामुळे त्यांना दाव्यास कारणच घडलेले नाही, असे नमुद केले.

१६. सोपान वि असी*.* चारीटी कमिशनर *(*२००४*)* ३ एस सी सी १३७ मध्ये नमुद केल्यानुसार दाव्यास कारण घडले नसल्यास त्याचे वादपत्र तात्काळ फेटाळावे याकामी वादीने एकापेक्षा जास्त तारखा नमुद करुन त्या तारखांना दाव्यास कारण घडले असे नमुद केले आहे. वादीचा दावा कायदयान्वये चालण्याजोगा नाही असे दि प्र सं क्रम ७ नियम ११ मधील तरतुदीवरुन स्पष्ट आहे. असे नमुद केले. काल्पनीक घटना हूशारीने नमुद करुन काल्पनीक कारण दाव्यात नमुद केले आहे असेही विधीज्ञांनी कथन केले.

१७. पंजाब शासन वि गुरुदेवसिंग *(१९९१)* ४ एस सी सी १ मध्ये नमुद केल्यानुसार प्राधिकरणने केलेला आदेश जरी बेकायदेशीर असला तरी तो बेकायदेशीर असल्याचे जाहिर होत नाही तोपर्यंत लागू राहतो. आणि त्यामुळेच जोपर्यंत वादी प्रतिवादी ५ च्या लाभातील पेन्शन आदेश बेकायदेशीर असल्याचे जाहिर करुन मागत नाही तोपर्यंत त्यांना दाव्याला कारणचा घडत नाही त्यामुळे वादपत्र फेटाळावे असे विधीज्ञांनी नमुद केले.

१८. टी अरविंदम वि टी व्ही सत्यपाल १९७७ ए आय आर २४२१ मध्ये नमुद केल्यानुसार वादपत्र वाचल्यावर त्यातून दावा दाखल करण्याचे कारण निष्पन्न होत नसल्यास तो दावा फेटाळावा असे नमुद आहे, असे विधीज्ञांनी कथन केले.

१९. पंजाब शासन वि धनजीतसिंग *(२०१४)* १५ एस सी सी १४४ मध्ये नमुद केल्यानुसार वादी बराच काळ आपल्या हक्कांवर गप्प राहील्यास त्यास प्रतिष्ठंभ या तत्वाची बाधा येते त्यामुळे दावा फेटाळाव असे विधीज्ञांनी नमुद केले.

२०. कुटूंबनिवृत्तीवेतन १९५० यासाठी नामनिर्देशन नमुना क्र ४ नियम ११७ *(७)* हा फॉर्म प्रतिवादी ५ तर्फे विधीज्ञांनी दाखवला व ज्यास पेन्शन मंजूर झाली त्यानेच त्याचे नॉमिनी ठरविणेचा व रदद करण्याचा अधिकार असल्याचे नमुद केले.

२१. वादपत्र वाचले असता त्यामध्ये जर दावा दाखल करण्याचे कारण दिसून येत नसेल तर असे वादपत्र नामंजूर करता येवू शकते. मुळात वादीचा दावा हा हक्कज्ञापनाचा आहे. त्यामध्ये वादी ही मयत मोहनराव यांची पहिली पत्नी आहे, असे जाहिर करुन मागितले आहे. प्रतिवादी १ ते ४ यांनी वादीस मयत मोहनराव याचे निवृत्तीवेतन दयावे अशी अन्य मागणी आहे.

२२. वादीच्या दाव्यातील कथनानुसार तिने वेगवेगळया अधिका-यांपुढे दिलेले अर्ज व केलेला पाठपुरावा याचा उल्लेख करण्यात आलेला आहे. दावा परिच्छेद १२ मध्ये दिनांक २४/११/२०१८ रोजी वादीस प्रतिवादी ४ कडून पत्र प्राप्त झाल्याचा उल्लेख आहे. तसेच परिच्छेद १२ मध्ये प्रतिवादी ५ हिला निवृत्तीवेतन मंजूर झाले त्या सप्टेंबर २०१८ आणि दिनांक ०४/०२/२०१९ या दोन तारखांचा उल्लेख आहे. त्यामुळे दाव्यास कारण घडल्याचे वादपत्रातून दिसते.

२३. सलीमभाई वि. महाराष्ट्र शासन ए आय आर २००३ एस सी ७५९ मध्ये नमुद केल्यानुसार वादपत्र वाचल्यावर त्यातील कथने व दाव्यास कारण यावरुनच तो दावा चालण्याजोगा आहे की नाही हे न्यायलयाला ठरविता येते. त्यासाठी प्रतिवादीनी

कैफियत देण्याची किंवा त्यांची कैफियत मागविणेची आवश्यकता नाही. प्रस्तूत दाव्यात वादी व त्यांचे ७ साक्षीदार यांचा उलटतपास पुर्ण झाला असून वादपत्र फेटाळण्याजोगी परिस्थीती जर असती तर या न्यायालयाने यापूर्वीच ते फेटाळले असते. तसेच अशा स्वरुपाचा अर्ज प्रतिवादीनी वादीचा पुरावा सुरु होण्यापुर्वी दिला असता. येणकेनप्रकारे दावा प्रलंबीत रहावा या उददेशाने प्रस्तूत अर्ज दिलेला आहे.

२४. प्रतिवादी ५ यांनी दाखल केलेले वर नमुद पहिले तीन न्यायनिर्णय तथ्याच्या अनुषंगाने या प्रकरणाशी जुळत नाहीत. न्यायनिर्णय क्रमांक ४,५ व ६ हे अंतिम युक्तीवादाच्या वेळी वापरण्याजोगे न्यायनिर्णय आहेत. त्यामुळे प्रस्तुत अर्जामध्ये कोणतेही सत्व नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

<u>आदेश</u>

१. अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. अर्जाचा खर्च अंतिम निकालात अंतर्भूत करण्यात येतो.

स्वाक्षरीत/-

(एस.एन.सरडे)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
अहमदपूर.

दिनांक ०९/०४/२०२६